**निशाणी ०१**

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २२३ नुसार फिर्यादीची पडताळणी**

मी शपथेवर निवदेन करते की, माझे नाव अलका रमेश बाबर, वय – ५९ वर्षे, व्यवसाय - मजुरी, रा.पिंपळे, ता.इंदापूर, जि.पुणे.

**१.** आरोपी क्र.१ ते ४ माझ्या जवळच राहतात. दि.२४/०४/२०२३ रोजी सकाळी ११ च्या सुमारास मी आमच्या घराच्या पुढील रस्त्यावरुन शेळ्या चारण्यासाठी निघाले होते. आरोपी माझ्याकडे पाहुन काहीतरी बोलुन हसत होते. मी त्यांना कारण विचारले असता आरोपी क्र.१ श्रीरंग मला असे म्हणाला की, “तुला घोडा लावतो” आरोपी क्र.२ जनाबाईने मला हाताला धरुन ओढले व शिवीगाळ केली. आरोपी क्र.४ निलेश माझ्या अंगावर धावुन येतो. तेथे माझा भाऊ शिवाजी व भावजय आक्का आले. त्यानंतर मी पोलिस स्टेशनला गेले. पोलिसांनी माझी तक्रार घेतली पण त्यावर कारवाई न केल्याने मी न्यायालयात तक्रार दाखल केली.

**पडताळणी पूर्ण.**

समक्ष,

PRAJKTA RAJEEV SABNIS Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS Date: 2025.03.11 17:12:43 +0530

**दि.११/०३/२०२५**

**(प्राजक्ता राजीव सबनीस)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,**
**ता.इंदापूर, जि.पुणे.**

(अलका रमेश बाबर)
फिर्यादीचा अंगठा